ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी मराठी साहित्य

**डॉ. विजया जितेन्द्र राऊत**
*मराठी विभागप्रमुख*
*विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स*
*नंदनवन, नागपूर*

**प्रस्तावना :**

विश्वातील बहुसंख्या संस्कृती या पुरूषप्रधान संस्कृती असून त्या लिंगसापेक्ष विषमभावावर आधारित आहेत. त्यामुळे हेतुपुरःसरपणे पुरूषप्रधान संस्कृतीत व समाजरचनेत पुरूषांच्या हितसंबंधाची व स्त्रियांच्या कनिष्ठतेची जपणूक निरनिराळया माध्यमातून प्रसंगानुरूप केली गेली. त्यामुळे ती समाजरचना पुरूषवर्गाला हितकारक तर स्त्रीवर्गाला अहितकारक ठरलेली आहे. शोषणाची जाणीव स्त्रियांना निरनिराळया कालखंडातून कमी–अधिक प्रमाणात होत आलेली आहे. परंतु आधुनिक काळात ती जाणीव तिला तीव्रपणे झाल्यामुळे तिने प्रस्थापित पुरूषप्रधान संस्कृतीविरूध्द जे बंड केले त्याचे आविष्करण तिच्या कृतीतून, वाणीतून व लेखणीतून प्रभावीपणे प्रकट झालेले दिसते. पुरूषप्रधान संस्कृतीत परंपरेचे व पुरूषार्थाचे एकीकडे गोडवे गातानाच दुसरीकडे स्त्रीला पत्नी, सती, दासी, देवदासी, कुलटा, रखेली, वेश्या, अस्पर्शा, परित्यक्ता, हुंडाबळी, बलात्कारबळी महत्वपूर्ण कार्य स्त्रीवादाने केलेले आहे. भारत हा विविधतेने नटलेला आणि नानाविध धर्माची जोपासना व आदर करणारा देश आहे. त्यामुळे येथे अस्तित्वात असलेल्या प्रत्येक धर्माची उद्दिष्टे आणि स्त्रियांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन त्यांना देण्यात आलेले स्वातंत्र्य आणि अधिकार भिन्न भिन्न स्वरूपाचे आहेत. प्रत्येक धर्म संस्थापनाचे कार्य जसे पुरूषांनी केले तसे पुढील पिढीकडे हस्तांतरित करण्याचे कार्य स्त्रियांनी केलेले आहे. तसेच संस्कृतीचे उत्थापन, उन्नयन आणि उत्कर्ष स्त्रियांमुळेच साधलेले आहेत असे शतपथ ब्राम्हण्य सांगते. यावरून वैदिक धर्मात स्त्रीचे सहकार्य व उपस्थिती आवश्यक होती हे सिध्द होते. त्याकाळी धार्मिक प्रार्थना व यज्ञयाग पती–पत्नी मिळून करीत असे. शिवाय सामगीत गाण्याची जबाबदारी स्त्रीची होती. पुढे ते कार्य विशिष्ट पुरोहित वर्गाकडे देण्यात आले. याशिवाय यज्ञासाठी तांदूळ कांडणे, बळी द्यावयाच्या पशूला स्नान घालणे, आहुती देणे, इ. कार्ये तिला करावी लागत होती. यावरून यज्ञयागाच्या तयारीपासून तर शेवटच्या विधीपर्यंतची सर्व तयारी पत्नीला करावी लागत असल्याचे दिसून येते. कारण पतीप्रमाणे तिलाही खास धार्मिक हक्क प्राप्त झाले होते. इतकेच नव्हे तर 'सीतायज्ञ', 'रूद्रबली यज्ञ', 'रूद्रयाग यज्ञ' केवळ स्त्रियांकडूनच होत होते. त्यावेळी मुलींचे उपनयन होत असल्याने स्त्रियादेखील पुरूषांप्रमाणे सकाळ–संध्याकाळ प्रार्थना करीत होत्या. उपनिषदांच्या काळात स्त्रिया सभासंमेलनात शास्त्रार्थ करीत असल्याचे उल्लेख आढळतात. एकूणच वैदिक काळातील स्त्री सन्मानाने व पुरूषांच्या बरोबरीने जीवन जगणारी होती. भारतातील एकूणच धर्मव्यवस्थेचा विचार करता प्रत्येकच धर्मात स्त्रियांच्या व्यक्ती स्वातंत्र्यात व त्यांच्या अधिकारात कमी अधिक फरक जाणवतो. काही ठिकाणी त्यांच्यावर धर्माची बंधने आढळतात तर कुठे धर्माचा उदात्त दृष्टीकोन असूनही पुरूषप्रधान संस्कृतीत त्यांना दुय्यमस्थान दिलेले दिसते. परंतु त्या विरोधात कुठेही स्त्रियांनी धर्माविरूध्द बंड पुकारलेले दिसत नाही तर प्रत्येक धर्मातील तत्वांचे निष्ठेने पालन करून धर्म जोपासण्याचे व धर्माची अस्मिता टिकविण्याचे कार्य केलेले दिसते. इग्रजांच्याच आगमनाने देशात पाश्चात्य विचार, कल्पना व तत्वज्ञान आले. त्यामुळे सर्वच क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडुन आले. शिक्षणामुळे धार्मिक व सामाजिक जागृती झाली व त्यातूनच स्त्रीवादी चळवळही पुढे आकारास आली. 'हिंदू महिला सभा' 'हिंदुस्थानी सेविका दल', 'स्त्री सेविका संघ' निर्माण झाले व त्यांनी स्त्रियांच्या उत्थानासाठी कार्य केले. तर राष्ट्रीय महिला संघटना, महिलांची भारतीय संघटना, भारतीय स्त्रियांचे राष्ट्रीय मंडळ, अखिल भारतीय महिला परिषद इ. च्या माध्यमातून स्त्रियांना कायदेशीर अधिकार मिळालेत. स्त्रियांना पुरूषांप्रमाणेच व्यक्तिस्वातंत्र्य, स्वतःचे आयुष्य स्वायत्तपणे घडविण्याचा अधिकार आहे. या मुख्य सूत्रावर सर्वच स्त्रीवाद्यांचा भर दिसून येते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून जगभर विविध संकल्पना साहित्याच्या आणि समीक्षेच्या प्रांतात उदयाला आल्या. त्यापैकी 'स्त्रीवाद' ही महत्वाची संकल्पना आहे. 'स्त्रीवाद' ही एक व्यापक संकल्पना आहे. आधुनिक काळात मराठीत ही संकल्पना पाश्चात्य देशातून आलेली आहे. पिढयान्‌पिढया आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव पाश्चात्य स्त्रियांना झाली. आपल्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक हक्कांकरिता स्त्रियांनी संघटीतरित्या प्रयत्न केले. यासाठी स्त्रियांना फार मोठा संघर्ष करावा लागला. या स्त्री संघर्षातून 'स्त्रीवाद' विचारसरणीचा जन्म झाला. हळूहळू ही संकल्पना संपूर्ण जगात पोहोचली. स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे. तिला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ कळणे. तिला तिच्या माणूसपणाबद्‌दल आत्मियता वाटणे, तिला तिचे हक्क अधिकार कळणे, तिला तिच्या अवमूल्यनाची आणि शोषणाची जाणीव होणे. तिने आपल्या दडपल्या जाणाऱ्या स्वत्वासाठी संघर्षमय होणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीने 'बाईपणाची' कात टाकून 'माणूसपणाचे' नवे रूप धारण करणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीला तिच्या गुलामीची जाणीव होणे आणि तिने आपल्या गुलामी विरूध्द बंड करणे हयालाच स्त्रीवाद असे नाव आहे.

'स्त्रीवाद' या संकल्पनेचा प्रथम वापर राजकीय हक्कासाठी आंदोलन, चळवळी यांच्याद्वारे पाश्चात दे ात झाला. स्त्री

व पुरूष यांच्यात जैविक लिंगभेद आहेच पण स्त्रीचे व्यक्तिमत्त्व मर्यादित व पुरूषी व्यवस्थेच्या दृष्टीने सोयीचे करण्यासाठी पुरूषप्रधान व्यवस्था स्त्री पुरूषांवर लिंगभाव, लिंगगंड, लिंगधर्म इ. संज्ञा आरोपीत करते. असे हे पुरूषसत्ताक व्यवस्थेचे अन्यायकारक राजकारण ओळखून उघडकीस आणणे आणि स्त्रीला तिच्या दुय्यम स्थानावरून केंद्रस्थानी आणणे हे स्त्रीवादाचे मूलभूत उद्यिष्ट आहे. तर प्रस्तापित पुरूषी राजकारणाला छेद देणे हे स्त्रीवादाचे कार्य आहे.

स्त्रीवादी साहित्य लिहिणाऱ्या लेखिकांच्या लेखनातून स्त्रीवादी जाणिवा प्रकर्षाने आढळतात म्हणूनच त्यांच्या साहित्याला 'स्त्रीवादी साहित्य' म्हटले जाऊ लागले. पाश्चात्य स्त्रीवादाच्या प्रभावातून व प्रेरणेतून मराठीत एकविसाव्या शतकाच्या पुर्वार्धात स्त्री चळवळीशी संलग्न असणाऱ्या सक्रिय कार्य व नेतृत्व करणाऱ्या मृणाल गोऱ्हे, निलम गोऱ्हे, शांताबाई किर्लोस्कर, विद्याबाळ, छाया दातार, सीमा साखरे, नलिनी पंडीत, पुष्पा भावे, विद्युत भागवत रझिया पटेल यांनी स्त्रीवादी भूमिकेतून संस्कृतिसंरचनेत स्त्रियांचे दुय्यमत्व, स्त्रियांचे प्रश्न त्यासाठी आवश्यक असणारे परिवर्तनाची गरज व दिशा ठरवणारे सामाजिकदृष्टया पोषक असे स्त्रीवादासंबंधी वैचारिक लेखन केले. याचा परिणाम स्त्रियांच्या समकालीन साहित्यनिर्मितीवर दिसून येते. स्त्रीवादी जाणिवेने सकस कादंबरी लेखन करणाऱ्यामध्ये गौरी देशपांडे, सनिया, आशा बगे, अंबिका सरकार, प्रतिमा इंगोले, प्रतिमा रानडे, मेघना पेठे, कविता महाजन ही नावे लक्षणीय आहेत. यांच्या लेखनातून स्त्रीवादाच्या भक्कम पाऊलखुणा सापडतात. याच पार्श्वभूमीवर एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर स्त्रीवादी जाणिवेचा आविष्कार करणारी कविता महाजन हया आहेत. शतकानु ातकापासून बंदिस्त असणारे स्त्रीजीवन 20 ते 21 व्या शतकात थोडा मोकळा श्वास घेऊ लागले. मूक स्त्री 'ब्र' उच्चारू लागली. पण केवळ 'ब्र' उच्चारून थांबली नाही तर तिने उच्चारलेला हा 'ब्र' तिच्या स्वत्वजाणिवेबरोबर अधिक मुखर होत गेला. पण हा प्रवास काही सहजसोपा नव्हता. स्त्रीच्या प्रचंड अशा मानसिक, भावनिक, सामाजिक, कौटुंबिक व मुख्य म्हणजे आत्मिक संघर्षाचे ते फलित आहे. परावलंबित्वापासून सर्वांगीण स्वावलंबनापर्यंतचा, दुर्बलतेपासून आत्मविश्वासापर्यंतचा, भीतीपासून आत्मनिर्भरतेपर्यंतचा स्त्रीचा हा प्रवास आहे. स्त्रीवाद प्रत्येक स्त्रीमध्ये व्यक्तीमध्ये या आशावादी वृत्तीची रूजवणूक करण्याच्या ध्येयाने कार्यरत असल्याचे दिसून येते. गीता साने, तारा मवाळकर हयांनी मराठी भाषेत स्त्रियांच्या सबंधात मौखिक लेखन केलेले आढळते. विभावरी शिरूरकर ते मलिका अमर शेख हयांच्यापर्यंत मराठी लेखिकांनी आपल्या लेखनांमध्ये स्त्रियांच्या विविध रूपांचा शोध घेतलेला दिसतो. मल्लिका अमर शेख या स्वातंत्र्यानंतरच्या बदलत्या आधुनिक स्त्रीचे प्रतिनिधिक रूप आहेत. स्त्री–मुक्ती चळवळीचा परिपाक यांच्या विचारात दिसतो. नामदेव ढसाळांनी जोडीदार म्हणून मल्लिका अमर शेख यांना सुख दिले नाही. पण नामदेव ढसाळाबद्दल त्यांना अजूनही प्रेम वाटते असे त्यांच्या लेखनातून दिसून येते. भारतीय संस्कृती हा एक हास्यास्पद असा मेलेला प्राणी आहे. असं मल्लिका अमर शेख हयांच ठाम मत आहे. माझा संसार सुखाचा चाललाय असं म्हणणाऱ्या 95 टक्के स्त्रिया निखालस खोटे बोलत असतात. अर्थात स्वतःच्या व्यक्त होणाऱ्या अस्तित्वाची गरज वाटते त्या शहरापासून खेडयापर्यंत, बंगल्यापासून झोपडीपर्यंत स्त्री ही आज एकाच समान पातळीवर उभी आहे. बधिर झालेली, भांबावलेली, सहनशील जग म्हणजे फक्त वाईट पुरूषांचंच असून कुठलीही जबाबदारी न घेता स्वतःला निमूट मिरवणारी, संसार या संकल्पनेसाठी आपलं एकुलतं एक अवघं अस्तित्व, व्यक्तित्त्व आपणहून पुसुन टाकणारी. भारतीय स्त्रीचं एक वैशिष्टय एक उघड सत्य मल्लिका सांगतात. आजची आत्मभान असलेली, स्वाभिमानी, स्वावलंबी स्त्री असाच विचार करते. कोणाचीच पर्वा न करता मल्लिका मनाला येईल तसे जगते. सर्वार्थानं स्वतःला उद्ध्वस्त करून घेते.

21 व्या शतकात पाऊल टाकणारी स्त्री स्वतंत्र विचाराची असून आपले कर्तृत्व सिध्द् करणारी आहे. अनुताई वाघ यांनी कोसबाडला केलेले आदिवासींसाठीचे काम आणि गोदावरी परूळेकर यांनी वारली समाजासाठी केलेले कार्ये ही कार्ये अजोड आहेत. आजच्या स्त्रिया बऱ्याच प्रमाणात स्वतंत्र झाल्या आहेत. शिक्षण घेत आहेत. वाढत्या सुखसोयीमुळे स्त्रियांचे घरातील कष्ट कमी झाले आहेत. त्यामुळे स्त्रियांना थोडा रिकामा वेळ मिळत आहे. या वेळेचा उपयोग ती स्वतःच्या आवडीच्या कामासाठी, छंदासाठी, मनोरंजनासाठी देत आहे. तरी पुरूषप्रधान संस्कृतीचा पगडा कमी झाला नाही. पण आज स्त्रिया स्वावलंबी झाल्या आहेत. स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. थोडे सामाजिक थोडे आर्थिक स्वातंत्र्य तिला मिळालेले आहे. तरी मानसिक स्वातंत्र्य, कौटुंबिक स्वातंत्र्य तिला नाही. स्त्री नोकरी करते पण त्यामुळे तिच्या समस्या कमी झाल्या नाहीत. मिळवत्या स्त्रीचे दुःख वेगळे आहे. जरी ती पैसे मिळवत असली तरी त्या पैशावर तिचा हक्क नसतो. डॉ. सुलोचना सोमण म्हणतात, अशाही काही मिळवत्या स्त्रिया होत्या. जेव्हा स्त्री पैसे मिळवायला लागते. तेव्हा तिला वाटते, चला आता आपले सगळे प्रश्न मिटणार, पण हे पैसे मिळवतांना, नोकरी करतांना तिच्या एकटीचे हाल होतात. त्यामुळे त्यांची नोकरी त्यांनाच अधिक त्रासदायक होते. माधवी देसाई या बाबतीत म्हणतात, ''माझी नव्हे तर साऱ्याच मिळवत्या स्त्रियांची ही शोकांतिका आहे. शिक्षण, कर्तव्य, गरज, सुख यांची भुलवण तिला पडते. ती स्वतःहून हे नोकरीचे, अर्थार्जनाचे जोखड गळयात बांधून घेते. ती नोकरी करते म्हणून घरातील तिची जबाबदारी कमी झाली नाही. उलट घर आणि नोकरी हे दोन्ही सांभाळावे लागल्याने तिची तारेवरची कसरत होत आहे. अर्थात आजची स्त्री ही कसरत करण्यात यशस्वी झाली आहे, यात शंका नाही. कारण आजची स्त्री अधिक मोकळी प्रगत आले. सिंधुताई गाडगीळ म्हणतात, आजच्या स्त्रीने प्रगतीचा केवढा पल्ला गाठला आहे. हे पाहून अचंबा वाटतो. आता पांढरपेशा स्त्रियांना मुक्ती हवी आहे. ती कशापासून? कुणापासून? पुरूषांच्या तथाकथित नवरे

शाहीपासून? संसार, अपत्य संगोपन हया तिच्या नैसर्गिक कर्तव्यापासून? की आणखीन कशापासून? ते माझ्या अल्पबुध्दीला तरी उमजत नाही. आजची स्त्री स्वाभिमानी, आत्मविश्वास असणारी, निर्णयक्षम व कर्तृत्ववान आहे. तिला जर या रूढी–परंपरेच्या हजारो वर्षाच्या निरर्थक गोष्टींपासून मुक्त केले तर ती केवळ स्वतःचीच नव्हे तर आपल्या कुटुंबाची, समाजाची उन्नती करू शकते. कमल देसाई यांनी आपल्या कथाकादंबऱ्यामधून स्त्रियांच्या बदलत्या जाणिवांची निर्मितिक्षम मांडणी केलेली आहे. 'काळासूर्य' मधील स्त्री ही बाईपणाच्या दृष्टीने वेगळी आहे. ती एकटी आहे. पण एकाकी नाही. ती निर्भय अशी आहे. तसेच गौरी देशपांडे याही स्त्रीवादी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या लेखिका आहेत. गौरी देशपांडे यांनी जे पाहिले, अनुभवले तेच तीव्र संवेदनासह मांडले आहे. त्यांच्या मते स्त्रीचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, तिचं अस्तित्वभान महत्वाचं असते. स्त्रीची स्वतंत्र निर्णयक्षमता स्वतंत्र जगच निर्माण करते. 'एक एक पान गळावया' मधील राधा या व्यक्तिरेखेच्या निमित्ताने व्यक्तिस्वातंत्र्याविषयी आपले मत त्या व्यक्त करतात. स्त्रीत घडणाऱ्या मूल्यात्मक बदलाची चाहूल त्या निःसंशयपणे मांडतात. गौरी देशपांडे यांच्या कथेतील स्त्रिया व्यक्ती म्हणून जगण्याची धडपड करतांना दिसतात. मेघना पेठे यांच्या कथांतील व कादंबरीतील स्त्रिया स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाचा विचार करतांना दिसतात. परंपरांना ही स्त्री छेद देते. स्वतःच्या स्वत्वाचा व सत्त्वाचाही विचार ही स्त्री करतांना दिसते. स्त्री–पुरूष संबंधाच्या बदलत्या जाणिवांचाही आविष्कार मेघना पेठे त्यांच्या कथा कादंबऱ्यातून घडवतात. यादृष्टीने त्यांचे 'आंधळयांच्या गायी', 'हंस अकेला', 'नातिचरामी' सारखी जीवनाचा मोठा पट स्त्रीवादी भूमिकेतून उलगडणारे लेखन दिसून येते. प्रिया तेंडूलकर या प्रवाहात लेखन करणाऱ्या अधिक धाडसाने बेछूटपणेही लिहिणाऱ्या कथा लेखिका. ज्याचा त्याचा प्रश्न हा त्यांचा कथासंग्रह. आपल्या कथातून सांकेतिक, वैवाहिक जीवनाच्या प्रस्थापित साच्यांचा आणि जीवनविषयक मूलभूत प्रश्नांचा त्या शोध भावनिक व वैचारिक प्रगल्भतेने घेतात. स्त्रीवादी साहित्याच्या दृष्टीने 'भूमि' लिहिणाऱ्या आशा बगे, ग्रामीण क्षेत्रातील स्त्रियांचे विश्वचित्रित करणाऱ्या प्रतिमा इंगोले 'अनुबंध' सारखा कथासंग्रह आणि 'विमुक्ता' ही कादंबरी लिहिणाऱ्या अरूणा सबाने यांची नावे स्त्रीवादी साहित्यिक म्हणून घेणे आवश्यक आहे.

**समारोप** :–

आजची स्त्री आत्मविश्वासी, आत्मभान, जागृती असलेलली झालेली आहे. स्त्रियांविषयींच्या समस्येची, प्रेमाची चर्चा जगभर झाली. महाराष्ट्रामध्ये या चर्चेचे पडसाद उमटले. अशा वेळी काही प्रश्न मनात निर्माण होतात. आजच्या आधुनिक प्रगत काळात स्त्रीला सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात समान संधी मिळते का? त्या स्वतः भोवतालच्या परिस्थितीशी संघर्ष देतात की मूकपणे सगळे सोसतात? बदलत्या काळानुसार तिच्यात परिवर्तन होतयं का? की ती पारंपारिक स्त्री प्रतिमेलाच चिटकून बसते आहे. तिला सामाजिक भान व राजकीय भान आहे का? आधुनिकता तिच्या फक्त वे ाभूषेत व केशभूषेत का? तिच्या स्वभावात, वृत्ती–प्रवृत्तीत बदल झाले काय? आपल्या समस्येविषयी जागरूकता तिच्यात आहे का? ती अधिक आत्मनिर्भर झाली का? पुरूषांची दृष्टी अजून स्त्री देहालाच महत्त्व देणारी आहे का? अशा अनेक प्रश्नांचा विचार करतांना असे दिसते की स्त्रियांमध्ये अजून प्रगती व्हायची आहे.

शेवटी असे म्हणता येईल की स्त्रियांना एकेकाळी समाजाने असे घराच्या संस्कृतीच्या चौकटीत बंदिस्त केले होते. शिक्षणाने, सुधारणेमुळे त्या आज चौकट मोडून पुढे जात आहेत. पण अलीकडे या चौकटीला धरून पुढे जाणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे. बराच काळ पिंजऱ्यात अडकवलेल्या पक्षाला आका ात सोडले तर त्याला किती उडू आणि किती नको असे होते. तो आपल्या पंखाच्या बळाचाही विचार करत नाही. आपल्या घरटयाचाही विचार करत नाही. पंख गळायला–तुटायला लागले तरी पर्वा करत नाही. उडण्याचे वेडच लागते त्याला. भव्य निळे आकाश त्याला खुणावत असते. आकाशातल्या तारकांची ओढ त्याला लागते. आज काही स्त्रिया कोणाचाही विचार न करता स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार घेत आहेत पण त्यांना नंतर परिस्थितीचे गांभीर्य कळते. आजची स्त्री फारच मुक्त झाली, फार प्रगत झाली. त्यामुळे कुटुंबसंस्था, समाज बिघडेल असे काही लोकांना वाटते. ते निरर्थक आहे. उलट शिक्षणामुळे स्त्रियांजवळ जो आत्मविश्वास आला आहे. त्यामुळे त्या महत्वाकांक्षी बनल्या आहेत. अनेक मानसिक ताणांना तोंड देऊन त्या स्वतःची प्रगती करत आहेत. भारतीय समाज व संस्कृती, पाश्चिमात्य समाज संस्कृतीसारखी नाही. यांचे भान आजच्या तरूणीला आहे. स्त्रियांना घराची, संस्कृतीची चौकट धरावी लागते. एक पाय त्या चौकटीत ठेवून त्या आकाशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रयत्नात आजची भारतीय स्त्री निश्चितच य ास्वी होईल असे म्हणायला हरकत नाही. ही गवसणी घालण्यासाठी तिला समंजस, विचारी, सुशिक्षित व सुसंस्कृत पुरूषाच्या हाताची गरज आहे. हे यश दोघांच्या सहजीवनानेच मिळेल अशी आशा आहे.

संदर्भ सूची –

1. *मराठीतील स्त्री – आत्मचरित्रांच्या सामाजिक अंगाने अभ्यास, सौ. श्रुती श्री. वडगबाळकर*
2. *स्त्री प्रश्न : एक आवर्त – विषमता, अन्याय, अत्याचार, अंजली कुळकर्णी*
3. *स्त्रीवाद : एक दृष्टिक्षेप, अरूणा सबाने*
4. *स्त्री संघर्षाची नवी रूपे, नंदिता गांधी, नंदिता शाह*